

# अविवा ऑफ्लुअन्स

AVIVA
| Life Insurance |

या पॉलिसीमध्ये, गुंतवणूकीच्या पोर्टफोलिओमधील गुंतवणूकीची जोखीम पॉलिसीधारकाला सोसावी लागेल. संलग्न विमा उत्पादनांमध्ये कराराच्या पहिल्या पाच वर्षांच्या कालावधीत कोणतीही लिक्विडिटी देऊ केली जात नाही. पाचव्या वर्षाच्या अखेरपर्यंत पॉलिसीधारक  पॉलिसी सरेंडर करू शकणार नाही/संलग्न विमा उत्पादनातील पूर्ण किंवा अंशात्मक पैसे काढू शकणार नाही.

## अविवा ॲफ्लुअन्स - व्यक्तिगत युनिट-लिंक्ड असहभागी जीवन विमा योजना

तुम्ही परीपूर्ण जीवन जगत असता आणि तुमच्या पैशाचा जास्तीत जास्त लाभ व्हावा अशी तुमची इच्छा असते. परंतु, चांगला काळ कायम रहावा यासाठी, तुमच्यापाशी चांगली जीवन विमा पॉलिसी असणे आवश्यक असते जी दुर्दैवी घटनांपासून तुमच्या कुटुंबाचे आर्थिक बाबतीत तर रक्षण करतेच परंतु तुमच्या पैशाची अनेक पटीने वाढ करते आणि तुम्हाला भविष्याची चिंता करावी न लागता वर्तमान काळ आनंदात देखील घालविता येईल याची काळजी घेते. सादर आहे, अविवा ॲफ्लुअन्स, जी काही दुर्दैवी घटना घडल्यास तुमच्या कुटुंबाला आर्थिक संरक्षण देऊ करते आणि बचतीच्या विविध पर्यायांद्वारे तुमच्या संपत्तीचा जास्तीत जास्त लाभ देते.

अविवा ॲफ्लुअन्समध्ये तुम्हाला मर्यादित कालावधीसाठी पैसे भरावे लागतात आणि तुम्हाला संरक्षण देते व दीर्घ कालावधीचे उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी, मग ते तुमच्या मुलामुलींचा विवाह असो किंवा तुमची निवृत्ती, त्यासाठी गुंतवणूक कायम ठेवता येते. तुम्ही 7 फंडांच्या पर्यायांच्या सहाय्याने परतावा योग्य प्रकारे वाढवू शकता आणि जोखमींच्या स्वरूपानुसार त्याची पद्धती बदलू शकता. तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी उद्याची चिंता न करता आज खर्च करू शकाल याची अविवा ॲफ्लूअन्स काळजी घेते.

## तुमच्या कुटुंबाचे आर्थिक संरक्षण करणारी आणि तुम्हाला त्यांची काळजी घेण्यास मदत करणारी योजना.

### साजेशी करा

- तुमची दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तुमच्या पॉलिसीची मुदत निवडा.
- आपल्या सोयीनुसार 7, 10, 15 वर्षे किंवा पॉलिसीच्या संपूर्ण कालावधीसाठी हप्ता भरण्याची निवड करा.
- 7 फंडांमधून निवड करा आणि फंडात गुंतवणूक करा किंवा तुमच्या जोखमीच्या स्वरूपाला साजेशा विविध फंडांमध्ये एकत्रित गुंतवणूक करा.
- सिस्टीमॅटिक ट्रान्सफर प्लॅनद्वारे साप्ताहिक किंवा मासिक पद्धतीने इक्विटी मार्केटमध्ये प्रवेश करण्याची निवड करा.

### उपलब्धता

- अचानक उद्भवणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी अंशात्मक पैसे काढण्याद्वारे पैसे उपलब्ध करून घ्या.
- योजनाबद्ध अंशात्मक पैसे काढण्याद्वारे तुमच्या नियोजित गरजा हाताळा.
- भविष्यासाठी टॉप अप्स द्वारे तुम्हाला अधिक मिळणारे पैसे त्याच इन्स्ट्रुमेंटसमध्ये गुंतवा.

### रिवॉर्डस

- ठराविक कालांतराच्या प्रमुख बूस्टर्स आणि परिपक्वता बूस्टर्सद्वारे गुंतवणूक कायम राखण्यासाठी रिवॉर्ड्स मिळवा.

### संरक्षणाची काळजी घ्या

- विमाधारकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास अशा परिस्थितीत किमान पेआऊटद्वारे किमान हमी रक्कम
- अपघाती मृत्यू झाल्यास अतिरिक्त हमी रक्कम.

## पात्रता

| | |
|---|---|
| प्रवेशाचे वेळी वय (मागील वाढदिवस) | किमान: 2 वर्षे \| कमाल: 50 वर्षे |

**परिपक्वतेच्या वेळी वय (मागील वाढदिवस)**

| हप्ता प्रदत्य मुदत (PPT) | किमान परिपक्वता वय | कमाल परिपक्वता वय |
|---|---|---|
| 7/10/15 वर्ष | 18 वर्ष | 65 वर्ष |
| 16 - 30 वर्ष | | 70 वर्ष |

**पॉलिसीची मुदत आणि हप्ता प्रदत्य कालावधी**

| पॉलिसीची मुदत (वर्षांमध्ये) | मर्यादित हप्ता प्रदत्य कालावधी (वर्षांमध्ये) | नियमित हप्ता प्रदत्य कालावधी (वर्षांमध्ये) |
|---|---|---|
| 15-17 वर्ष | 10 वर्ष | पॉलिसीच्या मुदती इतका |
| 18-30 वर्ष | 7, 10 & 15 वर्ष | पॉलिसीच्या मुदती इतका |

**वार्षिकीकृत हप्ता**

**नियमित हप्ता:** किमान:

| पॉलिसीची मुदत | हप्ता प्रदत्य कालावधी | वार्षिकीकृत हप्ता (रु. मध्ये) |
|---|---|---|
| 15-17 वर्षे | 10 पॉलिसीच्या मुदती इतकी | 2,00,000 |
| 18 आणि अधिक | 7 वर्षे | 1,50,000 |
| | 10/15, पॉलिसीच्या मुदती इतकी | 1,00,000 |

कमाल: मर्यादा नाही, बोर्डाने मंजूर केलेल्या पॉलिसीच्या कराराच्या अधीन

**टॉप अप हप्ता:**
किमान: ₹5,000
कमाल: मर्यादा नाही, बोर्डाने मंजूर केलेल्या पॉलिसीच्या कराराच्या अधीन

एकुण टॉप अप हप्त्याची रक्कम एकुण भरलेल्या नियमित हप्त्याच्या रकमेपेक्षा अधिक नसावी

**हमी रक्कम:**

हमी रक्कम ही वार्षिक हप्त्याच्या पटीत असेल आणि पॉलिसीची मुदत आणि वय यावर अवलंबून असते:

**किमान हमी रक्कम:**

| पॉलिसीची मुदत (वर्षांमध्ये) | प्रीमियम देय कालावधी | किमान हमी रक्कम: (रु. मध्ये) |
|---|---|---|
| | | वार्षिकीकृत हप्ता |
| 15-17 | 10, पॉलिसीची मुदती इतका | 20,00,000 |
| 18 आणि अधिक | 7 वर्षे | 15,00,000 |
| | 10/15, पॉलिसीच्या मुदतीइतकी | 10,00,000 |

किमान टॉपअप हमी रक्कम = 6250
जर किमान हमी रक्कम: वार्षिकीकृत हप्ताच्या 10 पट असेल
टॉप-अप हप्ता हमी रक्कम: टॉप-अप हप्ताच्या 1.25 पट
**कमाल हमी रक्कम:**
कमाल हमी रक्कम ही बोर्डाने मंजूर केलेल्या पॉलिसीच्या कराराच्या अधीन असेल.

| विमाधारकाचे प्रवेशाचे वेळी वय | PPT (वर्ष) | कमाल हमी रक्कम पटीत |
|---|---|---|
| <45 | 7 & 10 | कमाल (10, 0.5 * पॉलिसीची मुदत) |
| | 15 - 30 | पॉलिसीची मुदत |
| >=45 | 7 & 10 | 10 |
| | 15 - 30 | पॉलिसीची मुदत वजा 5 |

**अंगभूत अपघाती मृत्यू लाभ**

अंगभूत अपघाती मृत्यू हमी रक्कम ही मूळ हमी रकमेइतकी असेल.
जास्तीत जास्त ₹50 लाख (एका आयुष्यासाठी) च्या अधीन असेल, अविवा द्वारा जारी केलेल्या सर्व विद्यमान अपघाती मृत्यू लाभ संरक्षणांसह..
कमाल हमी रक्कम ही बोर्डाने मंजूर केलेल्या पॉलिसीच्या कराराच्या अधीन असेल.


**हप्ता प्रदत्य वारंवारिता**

केवळ वार्षिक

## ही योजना कशी काम करते?

श्री. अरिजीत त्रेहान हे 35 वर्षांचे व्यवस्थापन सल्लागार आहेत ज्यांना त्यांच्या सध्याच्या पैशांच्या आवश्यकतेची काळजी नाही. परंतु, त्यांच्या मुलाच्या विवाहासाठी पुरेसे पैसे उपलब्ध असतील याची काळजी घेणे आणि आरामदायी निवृत्त जीवनासाठी तजवीज करण्याची काळजी घेणे ह्यामध्ये त्यांना स्वारस्य आहे.

श्री. त्रेहान यांनी 10 वर्षांच्या पैसे भरण्याच्या मुदतीसह **अविवा ॲफ्लूअन्सची** निवड केली, जी 55 वर्षांच्या त्यांच्या स्वप्नातील निवृत्तीच्या वयानुसार आहे आणि उद्दिष्टानुसार 20 वर्षांची पॉलिसीची मुदत आहे. ते दर वर्षी रु.1.5 लाख हप्ता भरण्याचा निर्णय घेतात.




एकूण भरलेला हप्ता = **₹15,00,000**
परिपक्वता मूल्य 8% परतावा गृहित धरून = **₹3,488,766**
परिपक्वता मूल्य 4% परतावा गृहित धरून = **₹1,890,905**
मूळ हमी रक्कम : **₹15,00,000**
अपघाती हमी रक्कम: **₹15,00,000**


श्री. त्रेहान त्यांच्या मुलाच्या विवाहासाठी परिपक्वतेची रक्कम वापरू शकतील आणि निवृत्तीनंतरचे उत्पन्न सुरक्षित करण्यासाठी शिल्लक रक्कम वापरू शकतील.

## तुमच्या अविवा ॲफ्लूअन्स पॉलिसीत वाढ करण्याचा पर्याय

### टॉप अप: तुमच्या फंडाचे मूल्य वाढविण्यासाठी मधूनच मिळणाऱ्या लाभांची गुंतवणूक करण्याची संधी.

अतिरिक्त ठोस रक्कम गुंतविण्याचा पर्याय.

श्री. अरीजित त्रेहान हे त्यांच्या संस्थेतील एक महत्त्वाचे कर्मचारी आहेत आणि त्यांना चांगला रिटेंशन बोनस मिळतो. नवीन पॉलिसी खरेदी करण्याचा खर्च करावा न लागता ते त्यांच्या विद्यमान पॉलिसीत त्याची गुंतवणूक करतात.




टॉप अप हप्त्यामुळे परिपक्वता मुल्यात 8% वृद्धी दराने रु.15,80,364 इतकी वाढ होईल
(4% वृद्धी दराने रु. 10,16,869)

**अस्वीकरण:** द.सा. 4% आणि 8% गृहित परताव्याच्या दराने परिपक्वता मूल्याची खात्री दिली जात नाही आणि पॉलिसीधारकाद्वारे निवडलेल्या फंडाच्या परताव्याची ती कमाल किंवा किमान मर्यादा नाही आणि फंडाची कामगिरी ही गुंतवणुकीच्या भविष्यातील कामगिरीसह अनेक घटकांवर अवलंबून असेल.

## टॉप-अप हप्त्यासाठी महत्त्वाच्या अटी

- एकुण भरलेल्या टॉप अप हप्ताच्या 1.25 पट इतकी टॉप अप हप्त्याची हमी रक्कम असेल.
- सर्व देय हप्ते भरल्या असल्यास, पॉलिसीच्या शेवटच्या 5 वर्षांच्या कालावधी व्यतिरिक्त, कोणत्याही वेळी टॉप अप हप्ते भरण्याची परवानगी आहे.
- किमान परवानगी असलेली टॉप अप हप्ता रु. 5,000 आहे; कमाल मर्यादा नाही, बोर्डाने मंजूर केलेल्या पॉलिसीच्या कराराच्या अधीन असेल.
- एकुण भरलेली टॉप अप हप्त्याची रक्कम टॉप अप हप्त्याच्या तारखेपर्यंत भरलेल्या नियमित हप्त्याच्या रकमेपेक्षा जास्त असता कामा नये.

- टॉप अप हप्ता भरण्याच्या वेळी खास नमूद केले असल्याखेरीज नियमित हप्त्यानुसार टॉपअप हप्त्याचे त्याच फंडांमध्ये वाटपकरण्यात येईल.
- प्रत्येक टॉप अप हप्त्याला पाच वर्षांचा ''लॉक-इन-कालावधी'' असेल. अशा कालावधीत कोणत्याही प्रकारचे अंशात्मक पैसे काढण्याची परवानगी दिली जाणार नाही. ह्या कारणांमुळे पॉलिसी संपुष्टात आल्यास लॉक-इन-कालावधी लागू नसेल:
  - पॉलिसीच्या पहिल्या पाच वर्षानंतर पॉलिसीमधून पूर्ण पैसे काढणे / सरेंडर करणे.
  - विमाधारकाचा मृत्यू.

## फंडाचे पर्याय: तुमच्या जोखमीच्या स्वरूपानुसार निवड करण्यासाठी फंडाचे 7 पर्याय

| फंडाचे नाव आणि उद्दिष्ट | गुंतवणूकीची पद्धती | जोखमीचे स्वरुप |
|---|---|---|
| **बॅलन्स्ड फंड-II [SFIN: ULIF01508/01/2010LIBALAN-II122]:**<br>भांडवल वृद्धी आणि स्थिर परतावा यात समतोल साध्य करण्यासाठी. | डेट (25%-100%)<br>एमएम (0%-40%)<br>इक्विटी (0%-45%) | मध्यम |
| **बाँड फंड-II [SFIN: ULIF01608/01/2010LIFDEBT-II122]:**<br>उच्च गुणवत्तेच्या स्थिर उत्पन्न सिक्युरिटीजमधील गुंतवणूकीद्वारे स्थिर उत्पन्न मिळविणे. | डेट (60%-100%)<br>एमएम (0%-40%)<br>इक्विटी (0%) | कमी |
| **एन्हान्सर फंड-II [SFIN: ULIF01708/01/2010LIFENHN-II122]:**<br>इक्विटीतील उच्च गुंतवणुकीसह आक्रमक, दीर्घ मुदतीत भांडवल वृद्धी साध्य करण्यासाठी. | डेट (0%-40%)<br>एमएम (0%-40%)<br>इक्विटी (60%-100%) | उच्च |
| **ग्रोथ फंड-II [SFIN: ULIF01808/01/2010LIGROWT-II122]:**<br>इक्विटीतील उच्च गुंतवणुकीसह दीर्घ मुदतीत भांडवल वृद्धी साध्य करण्यासाठी. | डेट (0%-50%)<br>एमएम (0%-40%)<br>इक्विटी (30%-85%) | उच्च |
| **इन्फ्रास्ट्रक्चर फंड-[SFIN: ULIF01908/01/2010LIFEINFRAF122]:**<br>इन्फ्रास्ट्रक्चर आणि संबंधित इक्विटीमध्ये गुंतवणूकीद्वारे स्थिर उत्पन्न मिळविणे. | डेट (0%-40%)<br>एमएम (0%-40%)<br>इक्विटी (60%-100%) | उच्च |
| **प्रोटेक्टर फंड [SFIN: ULIF02108/01/2010LIPROTE-II122]:**<br>इक्विटीतील किमान गुंतवणूकीसह स्थिर उत्पन्न मिळविणे. | डेट (25%-100%)<br>एमएम (0%-40%)<br>इक्विटी (0%-20%) | कमी |
| **पीएसयू फंड [SFIN: ULIF02208/01/2010LIFEPSUFND122]:**<br>पीएसयू आणि संबंधित इक्विटीमधील गुंतवणूकीसह स्थिर उत्पन्न मिळविणे. | डेट (0%-40%)<br>एमएम (0%-40%)<br>इक्विटी (60%-100%) | उच्च |

MM म्हणजे मनी मार्केट आणि इतर रोख इन्स्ट्रुमेंटस.

## खंडित पॉलिसी फंड

| फंडाचे नाव आणि उद्दिष्ट | मत्ता विभाजन | जोखमीचे स्वरुप |
|---|---|---|
| **खंडित पॉलिसी फंड [SFIN: ULIF03127/01/2011LIDISCPLCY122]:**<br>IRDAIने वेळोवेळी निश्चित केल्यानुसार किमान खात्रीशीर दर निश्चित करणे. | MM: 0 ते 40%<br>सरकारी सिक्युरिटीज:<br>60% ते 100% | कमी |

खंडित पॉलिसी फंडाला लागू असलेला सध्याचा किमान खात्रीशीर व्याज दर द.सा. 4% आहे.

MM म्हणजे मनी मार्केट आणि इतर रोख इन्स्ट्रुमेंटस.

## सिस्टीमॅटिक ट्रान्सफर प्लॅन (एसटीपी): रूपी कॉस्ट एव्हरेजिंगचा पर्याय उपलब्ध

सध्याचे पोर्टफोलिओ व्यवस्थापन जसे आम्ही तुमचे पैसे डेबिट फंड आणि इक्विटी फंडामध्ये व्यवस्थित पद्धतीने विनामूल्य स्विच करतो व अशा प्रकारे इक्विटीमधील गुंतवणूकीचा एकूण धोका कमी होतो.

- प्रोटेक्टर फंड-II मध्ये किमान 10% हप्त्याचे वाटप केल्यास ही सुविधा उपलब्ध आहे.
- ह्या वैशिष्ट्यामुळे शेवटच्या-II वर्षांव्यतिरिक्त, पॉलिसीच्या मुदतीच्या कालावधीत, निवड केल्यानुसार, साप्ताहिक किंवा मासिक पद्धतीने प्रोटेक्टर फंड-II मधून एन्हान्सर फंड-II मध्ये आपोआप स्विचिंग करता येईल.

### साप्ताहिक STP च्या बाबतीत

| | |
|---|---|
| आठवडा 1 | आठवडा 1 च्या अखेरीस शेवटी 1/52 उपलब्ध युनिटस |
| आठवडा 2 | आठवडा 2 च्या अखेरीस शेवटी $1/5^{st}$ उपलब्ध युनिटस |
| आठवडा 26 | आठवडा 26 च्या अखेरीस शेवटी $1/27^{th}$ उपलब्ध युनिटस |
| आठवडा 51 | आठवडा 51 च्या अखेरीस शेवटी 1/2 उपलब्ध युनिटस |
| आठवडा 52 | आठवडा 52 च्या अखरीस शिल्लक उपलब्ध युनिटस |

### मासिक STP च्या बाबतीत

| | |
|---|---|
| महिना 1 | महिना 1 च्या अखेरीस शेवटी $1/12^{th}$ उपलब्ध युनिटस |
| महिना 2 | महिना 2 च्या अखेरीस शेवटी $1/11^{th}$ उपलब्ध युनिटस |
| महिना 6 | महिना 6 च्या अखेरीस शेवटी $1/7th^{th}$ उपलब्ध युनिटस |
| महिना 11 | महिना 11 च्या अखेरीस शेवटी $1/2^{th}$ उपलब्ध युनिटस |
| महिना 12 | महिना 12 च्या अखरीस शिल्लक उपलब्ध युनिटस |

### रिव्हर्स STP

मागील 2 वर्षात (म्हणजेच परिपक्वतेच्या अगोदर 24 महिने), एनहान्सर फंड -II मधून प्रोटेक्टर फंड -II मध्ये निधी खालील पद्धतीने स्विच केला जाईल:

| | |
|---|---|
| महिना 1 | 24 व्या महिन्याच्या सुरुवातीस उपलब्ध 1/24 युनिट |
| महिना 2 | परिपक्व होण्याच्या 23 व्या महिन्याच्या सुरुवातीस उपलब्ध 1/23 युनिट |
| महिना 12 | 12 व्या महिन्याच्या सुरुवातीस उपलब्ध 1/13 युनिट |
| महिना 23 | परिपक्व होण्याच्या 2 व्या महिन्याच्या सुरुवातीस उपलब्ध 1/2 युनिट |
| महिना 24 | मागील महिन्याच्या सुरुवातीस शिल्लक उपलब्ध युनिटस |

- प्रोटेक्टर फंड-II मधून एन्हान्सर फंड-II मध्ये स्विचिंगच्या कालावधी दरम्यान प्रोटेक्टर फंड-II मध्ये किंवा त्यातून कोणत्याही स्विचला परवानगी नाही. त्याचपमाणे एन्हान्सर फंड-II मधून प्रोटेक्टर फंड-II मध्ये स्विचिंगच्या कालावधी दरम्यान एन्हान्सर फंड-II मध्ये किंवा त्यातून कोणत्याही स्विचला परवानगी नाही.
- STP अंतर्गत सर्व स्विचेस विनामूल्य असतील आणि त्यासाठी किमान स्विच व स्विचनंतर किमान शिल्लक रकमेसाठी कोणतेही बंधन नाही.
- STP प्रस्थापनेला सुरु करता येऊ शकतो किंवा शेवटच्या तीन पॉलिसी वर्षाव्यतिरिक्त कोणत्याही पॉलिसीच्या वर्धापनदिनाच्या किमान 30 दिवस अगोदर लेखी नोटीस देऊन एसटीपी सुरु करता येऊ शकेल.
- पॉलिसी वर्धापनदिनाच्या किमान 30 दिवस अगोदर लेखी विनंतीद्वारे कोणत्याही पॉलिसी वर्धापनदिनाच्या वेळी STP बंद करता येऊ शकेल. हा पर्याय नंतर पुन्हा सुरु करता येऊ शकेल.
- पॉलिसीधारकाला गुंतवणूकीची जोखीम कायम सोसावी लागेल.

## स्विचिंग: तुमच्या फंडांचे मोफत व्यवस्थापन करण्याचा फायदा.

**बाजारातील संधींचा लाभ घेण्यासाठी फंडांमध्ये स्विच करण्यासाठी दरवर्षी 12 सुवर्ण संधी**

- या उत्पादनात उपलब्ध 7 फंडांमधील कोणत्याही वेळी स्विच संचयित फंडस.
- जोखमीचे बदलते स्वरूप किंवा बाजारपेठेतील बदलती परिस्थिती यानुसार युनिटस समायोजित करण्याची किंवा हलविण्याची स्विचिंग ही एक संधी आहे.
- पॉलिसी वर्षामध्ये पहिले बारा युनिटचे स्विचेस विनामूल्य असतील. लाभ न घेतलेले स्विचेस पुढे नेता येणार नाहीत.
- त्यानंतरच्या स्विचेससाठी स्विच केलेल्या रकमेवर 0.50% शुल्क आकारण्यात येईल, एका व्यवहारासाठी शुल्क किमान 25 रुपये आणि रू.500 पेक्षा जास्त असणार नाही. ज्या फंडातून युनिट स्विच केले जातील त्यातून हे शुल्क वजा केले जाईल.

## हप्त्याचे रिडायरेक्शन:
## तुमच्या भविष्यातील हप्ताच्या गुंतवणूकीच्या पद्धतीत बदल करण्याचे स्वातंत्र्य

**बाजारपेठेतील चढउतारांचा सर्वाधिक लाभ घ्या**

- पॉलिसीअंतर्गत विविध फंडांमध्ये भविष्यातील हप्त्याचे विभाजनाचे प्रमाण बदलण्याची परवानगी दिली जाते.
- एकदा विनंती स्वीकारली की, पुर्वीच्या विभाजनाची पद्धती अकार्यान्वित होईल.
- ही सुविधा विनामूल्य आहे.

## अंशात्मक पैसे काढणे:
## अचानक उद्भवणाऱ्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी तुमचे पैसे उपलब्ध करून घ्या.

**तुमच्या फंडातून अंशात्मक पैसे काढण्याची परवानगी देऊन लिक्विडिटीच्या समस्येचे निराकरण केले जाते.**

श्री. अरिजीत त्रेहान पॉलिसीच्या मुदतीत त्याच्या पालकांच्या परदेशी सहलीसाठी दोन वेळा पैशाची व्यवस्था करण्यासाठी अंशात्मक पैसे काढतात.




- मागील वाढदिवसाला विमाधारकाचे वय 18 वर्षे झाले असल्यास एका पॉलिसी वर्षात 4 वेळा परवानगी देण्यात आली आहे. पैसे काढण्याचा लाभ न घेतल्यास तो लाभ पुढे वापरता येणार नाही.
- नियमित हप्ताशी संबंधित फंड मूल्यातून पहिल्या पाच पॉलिसी वर्षांनंतर परवानगी आहे.
- टॉप अप हप्त्याशी संबंधित फंड मूल्यातून पैसे काढण्यासाठी प्रत्येक टॉप अप हप्ता भरल्याच्या तारखेपासून 5 वर्षांनंतर परवानगी असेल.
- सर्व प्रथम टॉपअप हप्त्याशी संबंधित फंड मूल्यातून, काही असल्यास आणि पात्र असल्यास, अंशात्मक पैसे काढण्यात येतील आणि त्यानंतर नियमित प्रिमिय मशी संबंधित फंड मूल्यातून पैसे काढण्यात येतील.
- किमान अंशात्मक पैसे काढण्याची रक्कम रू.5000 आहे.


- पैसे काढल्यानंतर नियमित हप्ता युनिट्सचे फंड मूल्य पहिल्या वर्षाच्या वार्षिकीकृत हप्ताच्या 2 पट पेक्षा कमी होता कामा नये. टॉप अप फंड मूल्यातून पैसे काढताना किमान शिल्लक रकमेची अट लागू होणार नाही.
- मृत्यूच्या वेळी, मृत्यूच्या लाभाची देय रक्कम निश्चित करण्यासाठी मागील 2 वर्षात अंशात्मक काढलेले पैसे / पद्धतशीरपणे काढलेले अंशत: पैसे यांची एकुण रक्कम मूळ हमी रकमेतून वजा करण्यात येईल. यासाठी टॉप अप हप्त्याद्वारे तयार झालेल्या युनिट्समधून अंशात्मक काढलेले पैसे वजा केले जाणार नाहीत.

## पद्धतशीर अंशात्मक पैसे काढणे: तुम्हाला विविध प्रकारचे खर्च भागविता येण्याचा फायदा आहे.

**एकदाच लेखी विनंती करून रचनात्मक रित्या पैसे काढून तुमच्या नियोजित गरजा भागवा.**

श्री. अरिजित त्रेहान त्यांच्या मुलाच्या ट्यूटोरियल्स आणि स्पर्धा परीक्षेची तयारी यासारख्या अधिक शैक्षिणक गरजांसाठी पैशाची व्यवस्था करण्यासाठी अंशात्मक पद्धतशीरपणे पैसे काढू शकतात.

**5 वर्षांसाठी पद्धतशीरपणे अंशात्मक पैसे काढणे**




- परिपक्वतेच्या अगोदर शेवटच्या 3 पॉलिसी वर्षांच्या दरम्यान व्यतिरिक्त पहिली पाच पॉलिसी वर्षे पूर्ण झाल्यानंतर पॉलिसीच्या कालावधी दरम्यान कधीही परवानगी आहे, परंतु विनंती करण्याच्या वेळी फंड मूल्य रु.5,00,000 किंवा अधिक असणे आवश्यक आहे.
- पेआउटची मुदत 3 ते बाकी पॉलिसीचा कालावधी ह्यापैकी कोणतीही संपूर्ण संख्या असू शकते.
- वार्षिक, सहामाही, तिमाही किंवा मासिक वारंवारतेपैकी कोणत्याही पद्धतशीरपणे पैसे काढण्याच्या पेआऊटसच्या पर्यायाची निवड करता येईल.
- ज्या महिन्यातून पैसे काढणे अपेक्षित आहे त्या महिन्याच्या किमान 15 दिवस अगोदर विनंती पाप्त झाली पाहिजे.
- दरवर्षी फंड मूल्याच्या 3% आणि 12% ह्या दरम्यान पैसे काढण्याची परवानगी आहे. जर पैसे काढण्याची वारंवारित जास्त असेल तर कमाल रक्कम त्या पमाणात कमी होईल.
- पैसे काढणे सुरू झाल्यास विनंती केलेली पैसे काढण्याची किमान रक्कम प्रति वर्ष रु.15,000 असावी.
- सर्व पेआऊटस पद्धतींसाठी थेट क्रेडिट / ECS पद्धती उपलब्ध आहे. फक्त वार्षिक आणि सहामाही पेआऊटस पद्धतींसाठी धनादेशाने पेआऊटस पद्धती उपलब्ध आहे.
- सर्व देयके थकबाकीने देण्यात येतील.
- जर पेआऊटसच्या कालावधी दरम्यान कोणत्याही वेळी, पहिल्या वर्षाच्या वार्षिकीकृत हप्ताच्या 2 पट पेक्षा फंड मूल्य कमी झाल्यास, पद्धतशीर अंशात्मक पैसे काढण्याची प्रक्रिया बंद होईल आणि प्रमाणित नियम व अटींनुसार पॉलिसी सुरू राहील.
- मृत्यूच्या वेळी, मृत्यूच्या लाभाची देय रक्कम निश्चित करण्यासाठी मागील 2 वर्षात अंशात्मक काढलेले पैसे/पद्धतशीरपणे काढलेले अंशत: पैसे यांची एकुण रक्कम मूळ हमी रकमेतून वजा करण्यात येईल. यासाठी टॉप अप हप्ताद्वारे तयार झालेल्या युनिट्समधून अंशात्मक काढलेले पैसे वजा केले जाणार नाहीत.
- वरील अटींच्या अधीन राहून पॉलिसीच्या कालावधीत कोणत्याही वेळी हा पर्याय थांबविण्याची आणि पुन्हा सुरू करण्याची परवानगी आहे.

## योजनेचे लाभ

### `मृत्यू लाभ : तुमच्या कुटूंबाविषयी तुमची वचनबद्धता सर्वाधिक महत्त्वाची आहे

- विमित व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास, नामनिर्देशित व्यक्तीला हमी रक्कम किंवा किंवा नियमित / मर्यादित हप्त्याशी संबंधित फंड मूल्य किंवा नियमित हप्त्याच्या 105% इतकी रक्कम, ह्या 3 पैकी जी अधिक असेल तितकी रक्कम देण्यात येईल.
- पॉलिसीमध्ये टॉप अप हप्ता भरले असल्यास, टॉप अप हमी रकमेचा अधिक पेआऊट किंवा टॉप अप हप्त्याशी संबंधित फंड मूल्य किंवा टॉप अप हप्त्याच्या 105%, ह्या 3 पैकी  जी अधिक असेल तितकी रक्कम देण्यात येईल.
- पॉलिसीच्या मुदतीत 18 ते 70 वया दरम्यान अपघातामुळे मृत्यू झाल्यास, अपघाती मृत्यू लाभासाठी अधिक पेआऊट देय असेल. पॉलिसी परिशिष्टात अपघाती मृत्यू हमी रक्कम नमूद करण्यात येईल.

**कृपया नोंद घ्या:**

मृत्यूच्या वेळी, मृत्यूच्या लाभाची देय रक्कम निश्चित करण्यासाठी मागील 2 वर्षात अंशात्मक काढलेले पैसे / पद्धतशीरपणे काढलेले अंशत: पैसे यांची एकुण रक्कम मूळ हमी रकमेतून वजा करण्यात येईल. यासाठी टॉप अप हप्ताद्वारे तयार झालेल्या युनिट्समधून अंशात्मक काढलेले पैसे वजा केले जाणार नाहीत.

जर पॉलिसी खंडित पॉलिसी फंडात जमा झाली आणि त्या नंतर विमाधारकाचा मृत्यू झाल्यास नामनिर्देशित व्यक्तीला खंडित पॉलिसीची रक्कम देय असेल.

### परिपक्वता लाभ : तुमच्या जबाबदाऱ्या पूर्ण करताना रिवॉर्डसचा लाभ घ्या

- परिपक्वतेपर्यंत जिवंत राहिल्यास, नियमित हप्ते, टॉप अप हप्ते, काही असल्यास, आणि मॅच्युरिटी बूस्टर ॲडिशन्स शी संबंधित फंड मूल्य मिळवा.
- खालील तक्त्यानुसार परिपक्वतेला नियमित हप्तेशी संबंधित फंड मूल्याच्या टक्केवारीनुसार मॅच्युरिटी बूस्टर ॲडिशन्सचा हिशोब केला जातो.

| पॉलिसीचा हप्ता प्रदत्य मुदत (वर्षांमध्ये) | मर्यादित / नियमित हप्त्याशी संबंधित फंड मूल्याच्या % इतकी मॅच्युरिटी बूस्टर ॲडिशन्स |
|---|---|
| 7 | 0.65% |
| 10 | 0.70% |
| 15 | 0.75% |
| 16 - 30 | 0.80% |

- प्रदत्य केलेल्या पॉलिसीसह परिपक्वता कालावधी पूर्ण करणाऱ्या सर्व पॉलिसीजसाठी मॅच्युरिटी बूस्टर ॲडिशन्स देय आहे.

### वाढता माईलस्टोन बूस्टर (IMB): गुंतवणूक कायम ठेवणे फायद्याचे आहे

IMBच्या वाटपासाठी संबंधित पॉलिसी वर्धापनदिनाच्या तारखेपर्यंत देय प्रिमियम्स भरुन पॉलिसी सुरू ठेवल्यास ह्या योजनेत ''वाढता माईलस्टोन बूस्टर्स (IMB)'' देण्यात येतील. IMB भर ही नियमित हप्त्याशी संबंधित फंड मूल्याची टक्केवारी असते आणि खालील अटींच्या अधीन राहून ती फंड मूल्यात जमा केली जाते.

- IMB च्या वाटपासाठी संबंधित पॉलिसी वर्धापनाच्या तारखेपर्यंत विमाधारक जिवंत असला पाहिजे.
- पॉलिसी वर्धापन दिन आणि परिपक्वतेची तारीख एकाच वेळी येत असल्यास त्यास IMB लागू नाही.

- टॉप अप हप्त्याशी संबंधित फंड मूल्यावर,काही असल्यास, IMB ॲडिशन्स लागू नाहीत.
- IMB खालील तक्त्यानुसार असेल:

| युनिट फंडाच्या वाटपाची तारीख | मर्यादित / नियमित हप्त्याशी संबंधित फंड मूल्याचे % इतके IMB |
|---|---|
| 10व्या पॉलिसी वर्धापन दिनाला | 0.50% |
| 15व्या पॉलिसी वर्धापन दिनाला | 0.55% |
| 20व्या पॉलिसी वर्धापन दिनाला | 0.60% |
| 25व्या पॉलिसी वर्धापन दिनाला | 0.65% |

- वरील तक्त्यात देण्यात आलेल्या आयएमबी टक्केवारीची हमी दिली जाते आणि त्यात बदल करता येत नाही.
- पॉलिसीच्या वर्धापनदिनी म्हणजे मागील पॉलिसी वर्षाच्या शेवटी असलेल्या फंड मूल्यानुसार संबंधित पॉलिसी वर्षाच्या सुरुवातीस IMBचे वाटप केले जाते.

कृपया लक्षात घ्या की वरील तक्त्यात नमूद करण्यात आलेला पॉलिसीचा 10वा वर्धापन दिन म्हणजे 10 वे पॉलिसी वर्ष पूर्ण करणे. त्याचप्रमाणे 15 वा, 20 वा आणि 25 वा पॉलिसी वर्धापन दिन म्हणजे अनुक्रमे 15, 20 आणि 25 वे पॉलिसी वर्ष पूर्ण करणे.

## कर लाभ

- आयकर कायदा 1961 मधील विविध तरतुदींमध्ये नमूद केल्यानुसार हे उत्पादन वजावटी व इतर लाभांसाठी पात्र आहे, जे त्यात नमूद केलेल्या अटी पूर्ण करण्याच्या अधीन आहे. कृपया अधिक माहितीसाठी तुमच्या कर सल्लागाराचा सल्ला घ्या. कर कायद्यांत बदल होऊ शकतो.

## शुल्क

### हप्ता विभाजन शुल्क

- हे शुल्क भरलेल्या हप्त्या मधून वजा करण्यात येईल आणि हे शुल्क वजा केल्यानंतर उर्वरित रकमेची गुंतवणूक करण्यात येईल. हे शुल्क कोणत्या वर्षात हप्ता भरली त्यावर अवलंबून असेल.

| पॉलिसी वर्ष | हप्ता विभाजन शुल्क | |
|---|---|---|
| | मर्यादित / नियमित हप्ता | टॉप-अप हप्ता |
| 1st | 9% | 2% |
| 2nd | 7% | |
| 3rd ते 10th | 6% | |
| 11व्या पासून | 2% | |

### फंड व्यवस्थापन शुल्क

दैनंदिन पद्धतीने NAVsचा हिशोब करताना सर्व फंडांसाठी फंड व्यवस्थापन शुल्क (FMC) लागू असेल :
- खंडित पॉलिसी व्यतिरिक्त सर्व फंडांसाठी एफएमसी 1.35% दर साल असेल.
- खंडित पॉलिसी फंडासाठी दर साल 0.50% दराने एफएमसी लागू असेल.

### पॉलिसी प्रशासकीय शुल्क

- पॉलिसीच्या युनिट खात्यातून दर महिन्याला युनिटस वजा करून हे शुल्क आकारले जाईल.
- खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे पॉलिसीच्या संपूर्ण कालावधीत पॉलिसी प्रशासकीय शुल्क लागू असेल.

| पॉलिसी वर्ष | पॉलिसी प्रशासकीय शुल्क (दरमहा) |
|---|---|
| 1st | काही नाही |
| 2nd ते 5th | वार्षिकीकृत हप्त्याच्या 0.02% |
| 6th | वार्षिकीकृत हप्त्याच्या 0.20% |

- 7व्या पॉलिसी वर्षापासून नंतर वार्षिक हप्त्याच्या दरमहा 0.20% पॉलिसी प्रशासकीय शुल्कात दर वर्षी प्रत्येक पॉलिसी वर्धापनाला 2.50% इतकी वाढ करण्यात येईल.
- हे शुल्क दरमहा रु.500 हून अधिक असणार नाहीत.

## मॉरटॅलिटी शुल्क

- जोखीम रकमेवर मॉरटॅलिटी शुल्क आकारण्यात येईल, जो देय मृत्यू लाभ वजा हे शुल्क आकारण्याच्या दिवशी असलेले फंड मूल्य, मूळ आणि टॉपअपसाठी स्वतंत्रपणे, यातील फरक असेल.
- पॉलिसीच्या युनिट खात्यातून दर महिन्याला युनिटस वजा करून हे शुल्क आकारले जाईल.
- निरोगी व्यक्तीसाठी प्रत्येक हजार हमी रकमेसाठी नमुना वार्षिक शुल्क खालील प्रमाणे आहे:

| वय | 25 | 30 | 35 | 40 |
|---|---|---|---|---|
| पुरुष | 0.7774 | 0.8158 | 1.0037 | 1.4028 |
| महिला | 0.7816 | 0.7866 | 0.9068 | 1.2133 |

- मॉरटॅलिटी शुल्काहून अधिक प्रत्येक रु.1000 अपघाती मृत्यू लाभ हमी रकमेसाठी रु.0.60 अंगभूत अपघाती मृत्यू लाभ, लागू असल्यास, साठी आकारण्यात येतील.

## खंडिकरण शुल्क

- पहिल्या 5 वर्षात पॉलिसी खंडित करण्यात आल्यास हे शुल्क पॉलिसी युनिट खात्यातून वजा करण्यात येईल.

| जेथे पॉलिसी वर्षात पॉलिसी खंडित करण्यात आली असेल | खंडिकरण शुल्क |
|---|---|
| 1st | (AP* किंवा फंड मूल्य) च्या 6% ह्यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त रु.6,000 च्या अधीन |
| 2nd | (AP* किंवा फंड मूल्य) च्या 4% ह्यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त रु.5,000 च्या अधीन |
| 3rd | (AP* किंवा फंड मूल्य) च्या 3% ह्यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त रु.4,000 च्या अधीन |
| 4th | (AP* किंवा फंड मूल्य) च्या 2% ह्यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त रु.2,000 च्या अधीन |
| 5वा आणि पुढे | काही नाही |

*AP: वार्षिकीकृत हप्ता
टॉपअप हप्ता, काही असल्यास, त्याच्याशी संबंधित फंड मूल्यावर कोणतेही खंडिकरण शुल्क लागू नसेल.

IRDA ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक प्रणालींनुसार खंडित पॉलिसी फंड व्यवस्थापन शुल्कात वेळोवेळी बदल होऊ शकतात. खंडित पॉलिसी फंडाला लागू असलेला सध्याचा किमान खात्रीशीर व्याजाचा दर दरसाल 4% आहे.

## स्विचिंग शुल्क

एका पॉलिसी वर्षात पहिल्या 12 स्विचेससाठी कोणतेही शुल्क लागू नाही, त्यानंतरच्या स्विचेसवर स्विच केलेल्या रकमेच्या 0.50% शुल्क आकारण्यात येईल जे कमीत कमी रु.25 आणि जास्तीत जास्त रु.500 एका स्विचसाठी याच्या अधीन असेल.

## कर

सरकारने वेळोवेळी लागू केल्याप्रमाणे वस्तू व सेवा कर, उपकर लागू असेल त्याप्रमाणे, यासह, परंतु त्यास तितकीच मर्यादा नसलेले कर, लागू असतील. कर कायद्यात बदल होऊ शकतात. पॉलिसी प्रशासकीय शुल्क, मॉरटॅलिटी शुल्क, हप्ता विभाजन शुल्क, स्विचिंग शुल्क आणि खंडिकरण शुल्क यांची कंत्राटात खात्री दिली जाते.

# तुम्हाला माहित असल्या पाहिजेत अशा महत्त्वाच्या अटी

## 1. लॉक-इन कालावधी

लॉक-इन कालावधी म्हणजे पॉलिसीच्या प्रारंभापासून ओळीने पाच पूर्ण वर्षांचा कालावधी ज्या कालावधी दरम्यान, कंपनीला, विमाधारक व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्या व्यतिरिक्त, पॉलिसीधारकाला किंवा त्याच्या विमाधारक व्यक्तीला, जसे असेल त्याप्रमाणे, पॉलिसीचे पैसे देता येत नाहीत.

## 2. अल्पवयीन व्यक्तीस संरक्षण

प्रारंभाच्या तारखेला विमाधारक व्यक्ती अल्पवयीन असल्यास,

- पॉलिसीधारकाला प्रिमियम्स भराव्या लागतील जे एकतर विमाधारक व्यक्तीची आईवडिल किंवा आजीआजोबा किंवा कायदेशिर पालक असतील. हप्ता प्रदत्य कालावधी पूर्ण होण्यापुर्वी पॉलिसीधारकाचा मृत्यू झाल्यास, विमाधारक व्यक्तीचे बाकी जिवंत आईवडिल/कायदेशिर पालक हे भविष्यातील प्रिमियम्स भरू शकतील. विमाधारक व्यक्ती अल्पवयीन असल्यास आणि भविष्यातील प्रिमियम्स भरल्या नाहीत तर खंडिकरणाची तरतूद लागू असेल.

- विमाधारक व्यक्ती अल्पवयीन असताना पॉलिसीधारकाचा मृत्यू झाल्यास, आवश्यक अर्ज आणि कंपनीला आवश्यक असल्याप्रमाणे पूरक दस्तऐवज सादर केल्यानंतर विमाधारक व्यक्तीचे जिवंत आईवडिल/कायदेशिर पालक यांच्या नावे पॉलिसी होईल.

- विमाधारक व्यक्तीचे वय 18 वर्ष पूर्ण झाल्यावर पॉलिसी आपोआप विमाधारक व्यक्तीच्या नावे होईल.

- पॉलिसीच्या प्रारंभाच्या तारखेपासून ताबडतोब जोखीम सुरू होईल.

## 3. मोफत पाहणी कालावधी

पॉलिसीधारकाला पॉलिसीचे दस्तऐवज मिळाल्याच्या तारखेपासून 15 दिवसांचे आत (दूरस्थ विपणन पद्धतीने पॉलिसीची विनंती केली असल्यास 30 दिवस) पॉलिसीचे नियम व अटी यांचा आढावा घेण्याचा अधिकार आहे. पॉलिसीधारकाला कोणतेही नियम व अटी मान्य नसल्यास, त्याला/ तिला त्यांच्या हरकतीचे कारण नमूद करून पॉलिसी परत करण्याचा अधिकार आहे.

पॉलिसीधारक पॉलिसी रद्द करण्याच्या तारखेला असलेले फंड मूल्य अधिक विभाजन न केलेली हप्त्याची रक्कम (विभाजन शुल्क) अधिक युनिटस रद्द करून आकारलेले कोणतेही शुल्क वजा संरक्षणाच्या कालावधी इतक्या प्रमाणात जोखीम शुल्क वजा वैद्यकीय तपासणीसाठी केलेला खर्च, काही असल्यास, आणि मुद्रांक शुल्क, इतकी रक्कम परत मिळण्यास पात्र असेल.

पॉलिसीचे नियम व अटी आमच्या वेबसाईटवर www.avivaindia.com येथे उपलब्ध आहेत.

## 4. सवलत कालावधी

कंपनीने कोणताही दंड किंवा विलंब न होता हप्ता भरण्याच्या अंतिम मुदतीच्या तारखेपासून दिलेला हा कालावधी आहे ज्या दरम्यान, पॉलिसीचे नियम व अटी यानुसार पॉलिसी चालू असल्याचे समजले जाते आणि कोणत्याही खंडाशिवाय जोखीम संरक्षण सुरू राहते. हप्ता भरण्यासाठी सवलत कालावधी 30 दिवसांचा आहे.

## 5. पॉलिसी खंडित होणे

''खंडिकरण'' म्हणजे पॉलिसीची अशी स्थिती जी पॉलिसी संरडर केल्यास, कंत्राटानुसार सवलत कालावधी संपण्याच्या अगोदर हप्त्याचे पैसे  न भरल्यास उद्भवते.

''खंडित पॉलिसी फंड'' म्हणजे कंपनीचा स्वतंत्र ठेवलेला निधी जो वेगळा ठेवला जातो आणि लॉक-इन कालावधीत सर्व खंडित केलेल्या पॉलिसीजच्या एकुण फंड मूल्याचा मिळून बनलेला असतो, जो चालू नियमांनुसार निश्चित केला जातो. ह्या दस्तऐवजाच्या गुंतवणुकीच्या पर्यायाच्या भागात खंडित पॉलिसी फंडाच्या गुंतवणुकीची रचना देण्यात आली आहे.

‘‘खंडित पॉलिसीचे पैसे’’ म्हणजे ज्या तारखेला पॉलिसी खंडित केली त्या तारखेला लागू व्याज दराने हिशोब करून व्याज जमा केल्यानंतर असलेले फंड मूल्य.

## A. लॉक-इन कालावधीत पॉलिसी खंडित होणे

सवलत कालावधी संपण्यापुर्वी जर आम्हाला संपूर्ण मर्यादित/नियमित हप्ता मिळाला नाही आणि सदर डिफॉल्ट लॉक-इन कालावधीच्या दरम्यान झाला तर आम्ही लागू खंडिकरण शुल्क वजा केल्यानंतर खंडित पॉलिसी फंडात फंड मूल्य जमा करू, आणि जोखीम संरक्षण आणि रायडर संरक्षण, काही असल्यास, ते रद्द होईल. अशा खंडिकरणाच्या वेळी, आम्ही पहिल्या न भरलेल्या मर्यादित/नियमित हप्ताच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत तुमच्या पॉलिसीच्या स्थितीची माहिती कळवू आणि तुम्हाला तीन वर्षांच्या पुनरूज्जीवन कालावधीच्या आत पॉलिसी पुनरूज्जीवित करण्याचा पर्याय देऊ.

तुम्ही तुमची पॉलिसी पुनरूज्जीवित* करण्याचा निर्णय घेतल्यास पुनरूज्जीवन कालावधीच्या आत तसे केले नाहीत तर पुनरूज्जीवन कालावधीच्या अखेरीस किंवा लॉक-इन कालावधीच्या अखेरीस, ह्यापैकी जे नंतर असेल तेव्हा, तुम्हाला खंडित पॉलिसी फंडाचे पैसे परत करण्यात येतील. पुनरूज्जीवन कालावधी लॉक-इन कालावधीनंतर संपत असल्यास, पुनरूज्जीवन कालावधीच्या अखेरपर्यंत तुमची पॉलिसी खंडित पॉलिसी फंडात राहील. ह्या कालावधीत खंडित पॉलिसी फंड व्यवस्थापन शुल्क लागू असेल आणि इतर कोणतेही शुल्क लागू नसेल.

तुम्ही वर नमूद करण्यात आलेल्या पर्यायाचा लाभ घेतला नाहीत तर कोणतेही जोखीम संरक्षण आणि रायडर संरक्षणाशिवाय, काही असल्यास, पॉलिसी सुरू राहील आणि सदर निधीची खंडित पॉलिसी फंडात गुंतवणूक करण्यात येईल. तुम्हाला खंडित पॉलिसी फंडाचे पैसे देण्यात येतील आणि लॉक-इन कालावधीच्या अखेरीस पॉलिसी बंद होईल.

तुम्ही पॉलिसी सरेंडर केल्यास, लॉक-इन कालावधीच्या अखेरीस किंवा सरेंडरच्या तारखेला, ह्यापैकी जे नंतर असेल तेव्हा खंडित पॉलिसी फंडाचे पैसे देय असलीत.

## लॉक-इन कालावधीच्या दरम्यान खंडित पॉलिसीचे पुनरूज्जीवन

तुम्ही पुनरूज्जीवन कालावधीच्या आत पॉलिसी पुनरूज्जीवित केल्यास, जोखीम संरक्षण पूर्ववत होईल आणि खंडित पॉलिसी फंडातून तुम्ही निवडलेल्या वेगवेगळ्या फंडांमध्ये गुंतवणूक करून पॉलिसी पुनरूज्जीवित होईल. खंडित पॉलिसी फंडातून लागू शुल्क वजा करण्यात येईल.

पुनरूज्जीवनाच्या वेळी, आम्ही:

- कोणतेही अधिक व्याज किंवा शुल्क न आकारता सर्व देय आणि न भरलेल्या मर्यादित/हप्त्याचे पैसे जमा करून घेऊ.
- खंडिकरण कालावधीत लागू असेल त्याप्रमाणे पॉलिसी प्रशासकीय शुल्क आणि हप्ता विभाजन शुल्क आकारण्यात येईल. खंडिकरण कालावधीत खात्री सुरू राहणे लागू असल्यास गॅरेन्टी शुल्क, लागू असल्यास ते वजा करण्यात येईल.
- इतर कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.
- पॉलिसी खंडिकरणाच्या वेळी वजा करण्यात आलेले खंडिकरण शुल्क फंडात पुन्हा जमा करण्यात येईल.

एकदा खंडित पॉलिसी पुनरूज्जीवित करण्यात आली की संपूर्ण जोखीम संरक्षणासह पॉलिसी सुरू असेपर्यंत वेळोवेळी लागू असलेली सर्व शुल्के आकारण्यात येतील.

## B. लॉक-इन कालावधीनंतर पॉलिसी खंडिकरण

आम्हाला सवलत कालावधी संपण्यापुर्वी मर्यादित/नियमित हप्त्याची संपूर्ण रक्कम मिळाली नाही आणि लॉक-इन कालावधीनंतर असा डिफॉल्ट घडल्यास, तुमची पॉलिसी प्रदत्य केलेल्या हमी रकमेसह कमी झालेल्या प्रदत्य केलेल्या पॉलिसीत बदलेल म्हणजे

$$\textbf{प्रदत्य केलेली हमी रक्कम} = \text{हमी रक्कम} \times \frac{\text{मिळालेल्या मर्यादित/नियमित हप्त्याची संख्या}}{\text{पॉलिसी अंतर्गत देय एकुण मर्यादित/नियमित हप्त्याची संख्या}}$$

पॉलिसी रायडर संरक्षण, काही असल्यास त्याशिवाय कमी केलेल्या प्रदत्य केलेल्या स्थितीत सुरू राहील. पुनरूज्जीवन कालावधीत सर्व शुल्क आकारण्यात येतील. परंतु, फक्त कमी केलेल्या प्रदत्य केलेल्या हमी रकमेनुसार मॉरटॅलिटी शुल्क वजा करण्यात येईल. अशा प्रकारे खंडिकरणाच्या बाबतीत, पहिल्या न भरलेल्या मर्यादित/नियमित प्रिमियमपासून तीन महिन्यांच्या आत आम्ही तुम्हाला तुमच्या पॉलिसीची स्थिती कळवू आणि तुम्हाला हे पर्याय देऊ:

i) पुनरूज्जीवन कालावधीच्या आत पॉलिसी पुनरूज्जीवित करणे, किंवा
ii) संपूर्ण माघार घेणे म्हणजे पॉलिसी संरडर करणे

तुम्ही तुमची पॉलिसी पुनरूज्जीवित करण्याचा निर्णय घेतलात परंतु पुनरूज्जीवित कालावधीत तसे केले नाहीत तर तुम्हाला पुनरूज्जीवन कालावधीच्या अखेरीस फंड मूल्याचे पैसे देण्यात येतील.

वर नमूद केलेल्या पैकी तुम्ही कोणत्याही पर्यायांचा अवलब केला नाहीत तर तुमची पॉलिसी कमी केलेल्या प्रदत्य केलेल्या स्थितीत सुरू राहील. पुनरूज्जीवित कालावधीच्या अखेरीस तुम्हाला फंडाचे पैसे देण्यात येतील आणि पॉलिसी बंद होईल. तुम्ही पॉलिसी सरेंडर केल्यास, आम्ही तुम्हाला फंड मूल्य देऊ.

## लॉक-इन कालावधीनंतर खंडित पॉलिसी पुनरूज्जीवित करणे

जर तुम्ही पॉलिसी पुनरुज्जीवन कालावधीत पॉलिसी पुनरुज्जीवित करण्याची निवड केली तर तुम्ही पुनरुज्जीवन कालावधी दरम्यान कोणत्याही वेळी आम्हाला लेखी सूचना देऊन पॉलिसी पुनरुज्जीवित करू शकता, जर:

तुम्ही तुमच्या स्वत:च्या खर्चाने आमच्या मंडळाने मंजूर केलेल्या पॉलिसीच्या करारानुसार आम्हाला विमाधारकाच्या विमायोग्यतेचा समाधानकारक पुरावा द्यावा. आम्ही पॉलिसी पुनरुज्जीवित करण्यापूर्वी अतिरिक्त माहिती मिळवू शकतो आणि पॉलिसीचे पुनरुज्जीवन नाकारण्याचा किंवा अतिरिक्त मॉरटॅलिटी शुल्क लागू करण्याचा अधिकार राखून ठेवू शकतो. पुनरुज्जीवनाच्या वेळी, कंपनी कोणतेही व्याज किंवा शुल्क न आकारता सर्व देय व न भरलेले हप्ता जमा करू आणि मूळ हमी रक्कम पुन:प्रस्थापित करू.

पुनरूज्जीवनाच्या वेळी, आम्ही :

- कोणतेही अधिक व्याज किंवा शुल्क न आकारता मर्यादित/नियमित हप्त्याची रक्कम जमा करू घेऊ आणि हप्ता विभाजन शुल्क आकारू.
- रायडर, काही असल्यास, तो देखील तुम्हाला पुनरूज्जीवित करावा लागेल, जे आमच्या मंडळाच्या पॉलिसीच्या कराराअंतर्गत मंजुर करण्याच्या अधीन असेल.
- कोणतेही इतर शुल्क आकारले जाणार नाही.

## 6. निव्वळ मत्ता मूल्याचा (एनएव्ही) हिशोब:

IRDAI द्वारा वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक प्रणालींनुसार NAV चा दैनंदिन पद्धतीने हिशोब केला जातो. IRDAIच्या चालू मार्गदर्शक प्रणालींनुसार फंडाच्या NAV चा याप्रमाणे हिशोब करण्यात येतो:

**फंडाद्वारा धारण केलेल्या गुंतवणुकीचे बाजारपेठेतील मूल्य**
**+**
**चालू मालमत्तेचे मूल्य - चालू दायित्व आणि तरतुदी, काही असल्यास त्यांचे मूल्य**

---

**मूल्यांकनाच्या दिवशी असलेल्या युनिटसची संख्या (युनिटस तयार करण्यापुर्वी / रिडंप्शनच्या अगोदर)**

7. पहिल्या हप्त्याचे पॉलिसीच्या प्रारंभाच्या दिवशीअसलेल्या NAV नुसार विभाजन करण्यात येईल.

8. हप्ता आगाऊ मिळाला असला तरी तिच्या देय तारखेला ती समायोजित करण्यात येईल. त्याचप्रमाणे, पॉलिसीच्या परिशिष्टात नमूद करण्यात आलेल्या नियोजित नियमित देय हप्ताहून कमी रक्कम अविवाद्वारा स्वीकारली जाणार नाही.

9. मुदतीच्या वेळेच्या आत व्यवहाराची विनंती प्राप्त झाल्यास, (स्थानिक धनादेश, डिमांड ड्राफ्ट, स्विचेस वगैरे द्वारे स्विचिंग, पैसे काढणे, सरेंडर आणि नूतनीकरणाचा हप्ता यासह) त्याच दिवसाच्या NAV ने तिचे विभाजन करण्यात येईल आणि अंतिम मुदतीनंतर प्राप्त झाल्यास दुसऱ्या दिवसाच्या NAV ने तिचे विभाजन करण्यात येईल. अंतिम मुदतीची वेळ ही IRDAI च्या वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक प्रणालींनुसार असेल जी सध्या दुपारी 3:00 ही आहे. बाहेरगावच्या धनादेशाद्वारे हप्ता प्राप्त झाल्यास, क्लियरन्सच्या तारखेला किंवा देय तारखेला असलेला, ह्या पैकी जे नंतर असेल त्या तारखेला असलेला NAV लागू असेल.

10. ह्या पॉलिसीवर अविवाकडून कोणतेही कर्ज देण्याची तरतूद नाही.

11. पॉलिसीचे पूनरुज्जीवन हे मंडळाने मंजूर केलेल्या करारातील आवश्यकता आणि न भरलेल्या प्रिमियम्सचे पैसे भरण्याच्या अधीन आहे.

12. विमा कायदा, 1938 मधील कलम 38 आणि 39, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, यातील तरतुदींनुसार नेमणूका आणि नामांकन करण्याची परवानगी आहे.

13. जोखीम स्वीकारल्याशिवाय आणि संपूर्ण हप्त्याची रक्कम मिळाल्याशिवाय अविवावर कोणताही दावा स्वीकारण्याचे दायित्व नाही .

## वगळण्याचे मुद्दे

### आत्महत्येमुळे मृत्यू:

- पॉलिसी सुरू होण्याच्या किंवा पॉलिसीच्या पुनरुज्जीवनाच्या तारखेपासून 12 महिन्यांच्या आत आत्महत्येमुळे मृत्यू झाल्यास, नामनिर्देशित व्यक्ती किंवा लाभधारक, मृत्यूची माहिती कळविल्याच्या तारखेला असलेले फंड मूल्य मिळण्यास पात्र असतील.

- फंड व्यवस्थापन शुल्क आणि गॅरेन्टी शुल्क या व्यतिरिक्त इतर कोणतेही शुल्क, काही असल्यास, मृत्यूच्या तारखेनंतर वसूल केले असल्यास, ते पुन्हा मृत्यूची माहिती कळविल्याच्या तारखेला उपलब्ध असलेल्या फंड मूल्यात समाविष्ट करण्यात येईल.

- सदर फंड मूल्याचे पैसे दिल्यानंतर पॉलिसी रद्द होईल.

### अपघातामुळे मृत्यू:

विमाधारकाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या खालील कारणांमुळे मृत्यू झाला असल्यास किंवा त्यास कारणीभूत असल्यास, पॉलिसीच्या कालावधी दरम्यान अपघाताने मृत्यू झाल्यास अधिक लाभ देय नसेल:

**i.** अल्कोहोलचे सेवन, किंवा

**ii.** मेडिकल प्रॅक्टिशनर द्वारा लिहून दिलेल्या ड्रग व्यतिरिक्त इतर अंमली पदार्थ घेण्यामुळे,

**iii.** विमाधारकाने एखादा गुन्हा केला असेल, किंवा

**iv.** स्वच्छेने स्वत:हून ईजा करुन घेतली असेल, आत्महत्या केली असेल किंवा आत्महत्येचा प्रयत्न केला असेल, किंवा

v. व्यावसायिक परवानाप्राप्त प्रवासी विमानात प्रवासी, केबिन क्रू आणि वैमानिक म्हणून केलेल्या प्रवासाव्यतिरिक्त इतर प्रकारे हवाई प्रवास, किंवा

vi. ॲथलेटिक्स किंवा पोहोणे या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या शर्यतीत भाग घेणे, किंवा

vii. कोणत्याही प्रकारचे युद्ध, आक्रमण, शत्रुत्व (घोषित किंवा अघोषित युद्ध), नागरी युद्ध, बंडखोरी, दंगली, सामाजिक दंगल, विद्रोह, लष्करी किंवा दडपशाहीची ताकद, किंवा हिंसाचाराच्या कृतींमध्ये हेतूपूर्वक सहभाग घेणे, किंवा

viii. अणू अपघातामुळे झालेला रेडिओॲक्टिव संसर्ग, किंवा

ix. पॅराशुटिंग, पॉटहोलिंग, पर्वतारोहण आणि हॉट-एअर बलुनिंग सह क्रीडा किंवा धोकादायक स्वरूपाच्या फावल्या वेळच्या उपक्रमात सहभागी होणे.

*अपघात म्हणजे बाहेरील, दृश्य आणि हिंसक पद्धतीने झालेला अचानक, दृष्टीपथात नसलेला आणि अस्वेच्छिक प्रसंग.

मेडिकल प्रॅक्टिशनर ही अशी व्यक्ती असते जिच्यापाशी कोणत्याही राज्यातील मेडिकल कौन्सिलची किंवा भारतातील मेडिकल कौन्सिलची नोंदणी असते किंवा भारत सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या नियमांनुसार होमिओपथीचा सेट असतो आणि त्यामुळे त्यांच्या क्षेत्रात औषधांचा सराव करण्यास आणि त्यांच्या परवान्याची व्याप्ती आणि परीक्षेत्रात काम करण्यास पात्र असते.

**मेडिकल प्रॅक्टिशनर यांचा समावेश:**

a) पॉलिसीधारकाचा जोडीदार (पतीपत्नी), वडील (सावत्र वडिलांसह) किंवा आई (सावत्र आईसह), मुलगा (सावत्र मुलासह), मुलाची पत्नी, मुलगी (सावत्र मुलीसह), मुलीचा नवरा, भाऊ (सावत्र भावासह) आणि बहीण (बहिणीसह) किंवा

b) ह्या पॉलिसी अंतर्गत विमाधारक/ पॉलिसीधारक

## प्रगटीकरण

- अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड हे फक्त कंपनीचे नाव आहे आणि अविवा ॲफ्लूअन्स हे फक्त युनिट-लिंक्ड जीवन विमा कंत्राटाचे नाव आहे आणि कोणत्याही प्रकारे त्याद्वारे कंत्राटाची गुणवत्ता, त्याचे भविष्य आणि परतावा ध्वनित केला जात नाही.
- ह्या कंत्राटातर्गत देऊ करण्यात आलेले विविध फंड ही फंडांची नावे आहेत आणि त्याद्वारे कोणत्याही प्रकारे ह्या योजनांची गुणवत्ता आणि त्यांचे भविष्य व परतावा ध्वनित केला जात नाही.
- कृपया विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा पॉलिसी दस्तऐवज किंवा विमा कंपनीकडून संबंधित जोखमी आणि लागू शुल्कांची माहिती करून घ्या.

## जोखमींचे घटक

- युनिट लिंक्ड जीवन विमा उत्पादने ही पारंपारिक विमा उत्पादनांहून वेगळी असतात आणि त्यास जोखमींचे घटक लागू आहेत.
- युनिट लिंक्ड जीवन विमा पॉलिसीसाठी भरलेल्या हप्त्याला भांडवल बाजाराशी निगडित जोखमी लागू आहेत आणि फंडाच्या कामगिरीनुसार व भांडवल बाजारावर परिणाम करणाऱ्या घटकांनुसार युनिटसचा एनएव्ही वर किंवा खाली जाऊ शकतो. विमाधारक / पॉलिसीधारक हे त्यांच्या/तिच्या निर्णयास जबाबदार असतील.
- युनिट-लिंक्ड फंडांना बाजारपेठेतील जोखमी लागू आहेत आणि गुंतवणूक फंडाचे उद्दिष्ट साध्य होईल याची खात्री देता येत नाही.
- गुंतवणूक फंडांची मागील कामगिरी तिच्या भविष्यातील कामगिरीची निर्देशक नाही. योजनेत गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना परताव्याची कोणतीही खात्री किंवा विश्वास दिला जाणार नाही.

## विमा कायदा 1938 मधील कलम 41 व 45

### विमा कायदा 1938 मधील कलम 41

विमा कायदा 1938 मधील कलम 41 मधील तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, लागू असतील.

**चालू तरतुदींनुसार:**

(1) कोणीही व्यक्ती भारतातील जीवन किंवा मालमत्ता ह्याच्याशी संबंधित जोखमींच्या संदर्भात विमा काढण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी किंवा तो सुरू ठेवण्यासाठी कोणाही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतेही आमिष देण्याची परवानगी देणार नाही किंवा परवानगी देऊ करणार नाही, देय कमीशनमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही हिस्स्यात किंवा पॉलिसीवर दर्शविण्यात आलेल्या हप्त्यात, कोणतीही सूट देऊ करणार नाही, किंवा पॉलिसी घेणारी, किंवा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कोणीही व्यक्ती विमा कंपनीच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार किंवा तक्त्यानुसार परवानगी असलेल्या देण्यात येणाऱ्या सूट व्यतिरिक्त, कोणतीही सूट स्वीकारणार नाही.

(2) ह्या कलमाच्या तरतुदींची पूर्तता करण्याच्या बाबतीत कोणाही व्यक्तीने काही हलगर्जीपणा केल्यास, दंड आकारला जाईल जो रू. दहा लाख पर्यंत वाढविला जाऊ शकतो.

### विमा कायदा 1938 मधील कलम 45

विमा कायदा 1938 मधील कलम 41 मधील तरतुदी, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, ह्या कंत्राटाला लागू असतील.

चालू तरतुदींनुसार, तीन वर्षांनंतर चुकीच्या विधानासाठी पॉलिसीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करता येणार नाही.

## अविवा बद्दल

अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड ही डाबर इन्व्हेस्ट कॉर्पोरेशन आणि अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड - UK तील विमा कंपनी यांचा संयुक्त उपक्रम आहे ज्यांचा भारताशी 1834 पासून संबंध आहे. अविवा लाईफ इन्शूरन्सची निवड केल्यास तुम्हाला जगातील एका सर्वाधिक जुन्या विमा समुहाचा व्यवस्थापनाच्या अनुभवाचा लाभ मिळतो ज्यांना 1696 पासूनचा इतिहास आहे.

## चौकशी आणि तक्रारी

अधिक माहिती, चौकशी आणि तक्रारीसाठी, कृपया आमच्याशी खालील क्रमांकांवर संपर्क साधा: 1800 180 2244 (BSNL/MTNL ग्राहकांसाठी टोल फ्री) किंवा 0124-2709046 किंवा 5676737 वर "Aviva" SMS करा.
फॅक्स क्रमांक. 0124-2709007

**वेबसाईट :** www.avivaindia.com

**अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड. (IRDA ऑफ इंडिया नोंदणी क्र.:122)**
डाबर इन्व्हेस्ट कॉर्पो. आणि अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड यांचा संयुक्त उपक्रम

**मुख्य कार्यालय:**
अविवा टॉवर, सेक्टर रोड, गोल्फ कोर्ससमोर, DLF फेज-5, सेक्टर 43, गुरगाव-122003

**नोंदणीकृत कार्यालय:**
2रा मजला, प्रकाशदीप बिल्डिंग, 7, टॉल्स्टॉय मार्ग, नवी दिल्ली-110001,

**CIN No.** U66010DL2000PLC107880

**उवैउस ID:** customerservices@avivaindia.com

**खोटे फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा:**

IRDA द्वारा जनतेस स्पष्टिकरण देण्यात आहे की:

- IRDA किंवा त्यांचे अधिकारी कोणतीही विमा किंवा आर्थिक उत्पादनांच्या विक्रीत सहभागी होत नाहीत किंवा हप्त्याची गुंतवणूक करत नाहीत.
- IRDA द्वारा कोणत्याही प्रकारच्या बोनसची घोषणा करण्यात येत नाही. अशा प्रकारचे कॉल्स स्वीकारणाऱ्या जनतेस दूरध्वनी क्रमांकाचा तपशिल, क्रमांक अशा माहितीच्या तपशिलासह त्या संबंधात पोलीसात तक्रार करण्याची विनंती करण्यात येत आहे.

अविवा ॲफ्लूअन्स ही एक व्यक्तिगत युनिट लिंक्ड असहभागी जीवन विमा योजना आहे. वर प्रदर्शित करण्यात आलेले ट्रेड लोगोज हे अविवा ब्रँडस लिमिटेड यांचे आहेत आणि अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड द्वारा त्यांचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. करलाभ हे विद्यमान करकायद्यांनुसार आहे ज्यात बदल होऊ शकतात. UIN: 122L111V02, Advt. No.: Jan 45/20.